मोफत ग्रंथालय

लेखिका: सारा स्टीव्हर्ट

चित्रे: डेव्हिड स्मॉल

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन







एलिझाबेथ ब्राउन
थेट आभाळातून खाली
या जगात आली.

एलिझाबेथ ब्राउन
अधूशी, हाडकुळी, लाजरी
या जगात आली.






तिला बाहुल्यांसंगे खेळणं नव्हतं पसंत,
तिला स्केटींगमध्ये नव्हती आवड.
ती लवकर वाचायला शिकली
भराभर आणि धडाधड.





ती चादरीचा तंबू बनवून
टॉर्चच्या प्रकाशझोतात
पुस्तक वाचता वाचता
झोपी जाई बिछान्यात.



एलिझाबेथ ब्राउन
शाळेत गेली
एक पेटारा घेऊन




एलिझाबेथ ब्राउनच्या
पुस्तकांच्या भाराने
गेला बिछाना मोडून.



ती वर्गात बसल्याबसल्या
कागदावर खरडत राहिली,
ऑलिंपिक वाचन स्पर्धेच्या
स्वप्नात रममाण झाली.



ग्रंथालय ओळखपत्रं बनवून
तिने दोस्तांना पुस्तकं वाटली,
अपरात्री त्यांच्या घरी जाऊन
पुन्हा ती गोळा केली.





एलिझाबेथ ब्राउनला
प्रेमबिमापेक्षा होती
पुस्तकं पसंत.

मित्रमंडळी बाहेर जाऊन
पहाटेपर्यंत नाचत तेव्हा
ती वाचत बसे उशीरापर्यंत.









एके दुपारी ती ट्रेनमध्ये बसली
आणि रस्ताच विसरून गेली,
एक घर घेऊन ती तिथेच राहिली
आणि शिकवण्या घेऊ लागली.





एलिझाबेथ ब्राउन
शहरात फिरली
उन्हाळा, पानगळ, हिवाळा आणि वसंतात.

एलिझाबेथ ब्राउन
शहरात फिरली
एकाच गोष्टीच्या शोधात.

तिला बटाट्याचे वेफर नको होते,
नको होते नवे कपडे तिला,
थेट पुस्तकांच्या दुकानात शिरून ती म्हणाली,
“एक पुस्तक द्याल का मला?”



एलिझाबेथ ब्राउन
घरी जाऊन करत बसली
वाचन, वाचन आणि फक्त वाचन.





व्यायाम करताना
आणि शीर्षासन करतानाही
तिने केलं वाचन एके वाचन.








किराणामालाची यादी बनवून
तिने ठेवली एका पुस्तकात,
पण यादी कुठेशी हरवली
आणि काहीच नाही बनलं स्वयंपाकात.



तिने ग्रीक देवतांबद्दल वाचलं
फरशा स्वच्छ करता करता,
तिने सहज संचार केला
पुस्तक वाचता वाचता.
.







खुर्च्यांवर पुस्तकांचा ढीग होता झाला
आणि फरश्यांवरही पुस्तकं पसरलेली.
तिचं वाचन वाढू लागलं तसं
पुस्तकांच्या भाराने शेल्फ पडू लागली.

मोठ्या पुस्तकांचा ढीगसुद्धा मोठा
त्यावर चहाचा कप बसला.
छोटी पुस्तकं बनली खेळण्यांचे भाग
लहान मुलांना खेळायला.





पुस्तकांनी साऱ्या भिंती व्यापून टाकल्या
त्यांनी समोरचा दरवाजाच अडवून धरला,
आता आणखी पुस्तकं कशी विकत घ्यायची?
तिच्यासमोर मोठा प्रश्न उभा ठाकला.




मग एलिझाबेथ
गेली शहरात
दुपारच्या प्रहरात


मग एलिझाबेथ
गेली शहरात
आनंदाचं गाणं गात

नको होती तिला सायकल,
नको होता रेशमी रुमाल.
थेट कोर्टात जाऊन विचारलं तिने–
“देणग्यांचा अर्ज मला द्याल?”

तिने अर्ज केला देणग्यांसाठी
त्यात तिने ठेवलं लिहून :
“मी एलिझाबेथ ब्राउन, शहराला
माझं सर्वस्व टाकते देऊन.”








एलिझाबेथ ब्राउन
मोफत ग्रंथालय





मग एलिझाबेथ ब्राउन
गेली मैत्रिणीकडे राहायला
लाभले दिर्घायुष्य तिला.



रोजच्या रोज
ते जात ग्रंथालयात,
पुस्तकांची पाने उलटत....
एकामागोमाग....





एकामागोमाग....

समाप्त